ललिता गंडभीर
C/O Pat Lawton
P.O.Box 29
Templeton, MA 01468
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
First Serial rights

# हत्तीच्या पाठीवर

न्यूयॉर्कहून टांझेनिया. तिथे सात दिवसांची सफारी. मग तिथून झिंबाब्वे. मुख्य हेतू व्हिक्टोरिया फॉलस् व झांबेसी नदीवर बोटीने प्रवास.

व्हिक्टोरिया फॉलस् प्रचंड मोठा. निसर्गाच्या शक्तीचे दर्शन घडवणारा. झांबेसीतून बोटीने प्रवास. बोट दुमजली. पाण्यात हिप्पो, सुसरी पोहतायत. एका बाजूला धबधब्याचे तुषार उंच हवेत उडताना दिसतायत. दुसऱ्याालाू नजर खिळवणारा सूर्यास्त.

दुसऱ्या दिवशी हत्तीवर बसून जंगलात सफर.

"आफ्रिकेतले हत्ती भारतीय हत्तीप्रमाणे माणसाळवता येत नाहीत." असं पूर्वीच्या गाइडने संगितलं होतं. मग हे हत्ती कुठले?

हत्तीवर बसून जंगलात फिरायचं? नुकतीच जीपमधून हिंस्र श्वापदं राहणाऱ्या जंगलात सफर केलीय. त्यात अविस्मरणीय सिंह, हत्ती, हिप्पो, चित्ते, बिबट्या वाघ, बफेलो, हाइना पाहिलेत. तशाच जंगलात हत्तीच्या पाठीवर बसून जायचं? मनात भीती पण हत्तीच्या लॉजवर पोचले.

लॉज लाकडी ओंडक्यांचा. ओंडक्यांवर बांधलेला. लॉजखालून झरा वाहतोय. एका बाजूला गिफ्ट शॉप. मागे मोठी खोली - थिएटर. त्यात चित्रफीत (फिल्म) दाखवण्यासाठी पडदा. पडद्यासमोर बाकडी. बाहेर मोठा तिन्ही बाजूने उघडा हॉल. हॉलभोवती कठडा. हॉलमधून झरा दिसतोय. झऱ्यात अनेक बदकं, सुसरी व हिप्पो.

सगळ्या व्हॅनस् आल्यावर आम्हाला पडदा लावलेल्या खोलीत जाण्याचं आमंत्रण. आम्ही बाकड्यावर बसलो.

गाइड भाषण देऊ लागतो. सुरवात कसेट फॉर्मने होते.

कसेट फॉर्म? मोठ्ठा विनोद म्हणायचा. देश मुगाबी ह्या हुकुमशहाच्या अमलाखाली. पार्क, होटेल सगळं सरकारचं. देशाच्या पैशाला काही किंमत नाही. त्याने काही विकत घेता येत नाही. "सुट्ट्या एका डॉलरच्या नोटा घेऊन जा. या देशात काही विकत घेतलं तर सुटे पैसे मिळत नाहीत." अशी सूचना आम्हाला मिळालेली. माझ्याकडे एका डॉलरच्या पाचशे नोटा.

आम्हाला इजा झाली तर फिर्याद कोणाकडे करणार?

"आम्हाला दुखापत झाली, आम्ही मेलो तर पार्कची जबाबदारी नाही" असं लिहिलेल्या फॉर्मवर मी सही करते.

टांझेनियात अशा फॉर्मवर सही केलेली नव्हती. आता सगळ्यांनीच सही केली.

भाषण सुरू झालं.

" 'आफ्रिकन हत्ती माणसाळवता येत नाहीत' हे खरं. आमच्याकडचे हत्ती एके काळी जंगलात राहणारे रानटी हत्तीच होते. दुर्दैवाने ते जंगलात हिंडताना जखमी झाले. प्रत्येक हत्तीची स्वतंत्र कथा आहे.

"काही हत्तींचे पाय पोचरने (बेकायदेशीररित्या हत्ती पकडणारे चोर) लावलेल्या सापळ्यात अडकून दुखावले गेले. कधी कधी हत्तीण मारली जाते. पिल्लू एकटं पडतं. त्याला पुरेसं दूध मिळालं नाही की ते जगत नाही. एखादे वेळी हत्ती वणव्यात सापडतात. हत्तीण पिल्लाला सोडून पळून जाते. हत्तीच्या कळपातला मुख्य नर म्हातारा झाला की दुसरा नर त्याला घालवून देतो. नवा नर

कळपातल्या पिल्लांना मारून टाकायचा प्रयत्न करतो. पिल्लाची आई त्याचं रक्षण करण्याचा प्रयत्न करते. पण पुष्कळदा त्या पिल्लाला इजा होते.

"मोठे हत्ती वणव्यात सापडून भाजतात. त्यांना इन्फेक्शन होते. अशा इजा झालेल्या हत्तींना आम्ही उपचार करून वाचवतो.

"पिल्लाला आम्ही बाटलीने दूध पाजतो. (दिवसाला तीन गॅलनस्!) ही पिल्लं सहज माणसाळतात. मोठे हत्तीही फार दिवस आमच्या रक्षणाखाली राहिले तर माणसाळतात. इ.इ." तो म्हणाला, "प्रत्येक हत्तीवर दोघाजणांनी बसायचं असतं. तेव्हा प्रत्येकाने आपला पार्टनर निवडावा."

काही सहप्रवाश्यांच्या जोड्या लागल्या. पण काहीजण एकएकटे राहिले. मग त्यांनी आपसात जोड्या लावल्या.

बाहेरच्या उघड्या हॉलमधे आम्ही हत्तीची वाट बघत बसलो. लक्ष होतं झऱ्याकडे. शांत पडलेल्या सुसरी काही हलत नव्हत्या. खूप सुंदर पक्षी येत जात होते.

ओळीने हत्ती येऊ लागले. प्रत्येक हत्तीच्या पाठीवर त्याचा माहूत होता. "तो माहूतच हत्तीची सुरवातीपासून काळजी घेत असे" असं मला नंतर कळलं.

हत्तीच्या पाठीवर कसं बसायचं ह्याचं गाइडने प्रात्यक्षिक करून दाखविलं.

एक उंच लाकडी प्लॅटफॉर्म होता. त्याच्या समोर हत्ती येऊन उभे राहत होते. त्यांच्या पाठीवर एक खोगीर होतं. खोगिराला पुढे एक लाकडी खुंटा जोडलेला होता. त्या खुंट्याला घट्ट धरून पुढच्या माणसाने बसायचं. मागच्या माणसाने त्याला कमरेभोवती मिठी मारायची. पाय अडकवायला कडी होती. चढल्यावर पाय वरती उचलणं महत्त्वाचं होतं. नाहीतर प्लॅटफॉर्ममधे व हत्तीत पाय चेंगरतो.

एकेक जोडी प्लॅटफॉर्मला जोडलेल्या शिडीवर चढून हत्तीवर स्वार होऊ लागली. आमची पाळी आली. सगळ्यात प्रचंड हत्ती आमच्या वाटेला आला होता.

आम्ही हत्तीवर चढलो. मी शरदच्या(पतिदेव) कमरेला घट्ट मिठी मारली. तो "थोडी सैल कर" म्हणू लागला. माहूत "हाय" म्हणाला. तो अगदी relaxed दिसला. मी सभोवताली नजर फिरवली. टांझेनियाच्या सफारीत दिसलं होतं तसंच जंगल होतं. उंच अर्धवट वाळकं गवत, मधेमधे पसरलेली झाडंझुडपं. "गवतात हिंस्र प्राणी, सिंह, चित्ता, बिबट्या वाघ, हाईना इत्यादी लपलेले असतात. ते प्राणी व हत्ती यांना माणूस दिसला तर त्यांना "ह्या माणसापासून आपल्याला धोका आहे असं वाटतं. ते माणसाला मारून टाकतात." ही टांझेनियातल्या सफारी गाइडची सूचना माझ्या लक्षात होती. पण "हत्तीच्या वाटेला कुणी जात नाही" असं तो म्हणाला होता हेही माझ्या लक्षात होतं. म्हणून हत्तीच्या पाठीवर आम्ही सुरक्षित होतो असं मला वाटलं. शिवाय 'आता मी मेले तर कुणाला फरक पडणार नाही. मुलं मोठी झालीत. जबाबदाऱ्या संपल्यात' हा विचार मनाला स्पर्श करून गेलाच.

सगळेजण हत्तीवर स्वार झाल्यावर एकामागून एक हत्ती अशी आमची वरात जंगलात निघाली. दोन गाइड दोन बाजूला चालत होते. आमच्या पुढे व मागे तिघेजण हातात बंदुका घेऊन चालले होते.

आमच्या आसपास इंपाला (हरण) आरामात चरत होती. दूर बफेलो व वील्डबीस्टचे कळप दिसत होते. एक दोन हाइना, पुम्बा (रानडुक्कर), शहामृगंपण दिसली. त्यांनी आमच्याकडे वळूनही पाहिलं नाही.

"हत्तीवर चालून येण्याचं धैर्य (किंवा मूर्खपणा) फक्त बफेलो करतात. हत्तीच्या समोर त्यांचं काही चालत नाही. पण ते हत्तींना शिंगाने इजा करतात." माहूत म्हणाला. "आम्ही बंदुकीचे बार काढतो. बहुतेक ते पळून जातात. क्वचित बंदुकीचा उपयोग करावा लागतो. बफेलोला मारावं लागतं."

"सिंह येतात का?" मी विचारलं.

"सिंह जवळपास असतील पण ते हत्तीच्या आजूबाजूला फिरकत नाहीत." माहूताचं उत्तर.

आमच्या रांगेत दोन तीन हत्तिणी होत्या. त्यांची पिल्लं त्यांच्याबरोबर चालत होती. मधे एक पिल्लू दूध पिऊ लागलं. आमची वरात थांबली. थोड्या वेळात त्या पिल्लाला काहीतरी दिसलं. त्याने दूध पिणं थांबवलं.

आमचा हत्ती सहज फांद्या मोड, लहान झाडं उपट! असे उद्योग जाताजाता करत होता. "हत्ती झाडाझुडपांची खूप नासधूस करतात." माहूत म्हणाला.

पुढे एक झरा आला. झऱ्यापलीकडे जायला खोल उतारावरून जावं लागत होतं. 'हे धूड उतारावरून कसं जाणार?' मनात विचार आला. झऱ्यात खूप सुसरी होत्या. 'आपण पडलो तर सुसरीला लंच मिळणार' मी मनात म्हटलं. हत्ती उतारावर खूप वाकला. माहुताने त्याच्या मानेला मिठी मारली. झऱ्यापलीकडे पोचल्यावर चढणीवर तोच प्रकार उलटा झाला.

पंचेचाळीस मिनिटं जंगलात हिंडल्यावर आम्ही परत आलो. हत्तीवरून उतरलो. हत्ती बाजूला आपापल्या जागी जाऊन उभे राहिले.

आमच्या प्रचंड हत्तीकडे बघत मी म्हटलं, "मॅमथ हा आदिकालीन हत्ती ह्या हत्तीपेक्षा मोठा म्हणजे केवढा प्रचंड असेल!"

आम्ही उतरलो तेव्हा हाइनांच्या गर्जना होत होत्या. गाइड म्हणाला, "आता आम्ही हत्तींना तुम्हाला हिंडवून आणल्याबद्दल खाण्याच्या पॅलेटस्‌चं (वड्यांचं) बक्षीस देतो. त्यातले काही खाली पडतात. ते खायला हाइना येतात. त्यांना दूर ठेवायला हत्तींना पॅलेटस् देण्याआधी आम्ही इथून दूर हाईनांना खाणं देतो. मग हत्तींना पॅलेटस् देतो. आज तुम्ही त्या हत्तींच्या तोंडात घालायच्या आहेत."

मग त्याने हत्तींमधल्या आपापसातल्या राजकारणाच्या कथा सांगितल्या. "हत्तिणींना पुष्कळदा एकीला पिल्लू झालं तर तिचा मत्सर वाटतो. त्या पिल्लाला इजा करण्याचा किंवा हत्तिणीशी भांडण्याचा

संभव असतो. म्हणून पिल्लं झालेल्या हत्तिणींना आम्ही वेगळं ठेवतो. जंगलात फिरायला जाताना त्यांना एकमेकांच्या जवळ चालू देत नाही. तारुण्यात प्रवेश करणारे हत्तीही भांडतात."

"आम्ही मुक्त हत्तींना आमच्या हत्तींपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करतो. ते एकमेकांसमोर आले तर काय होईल हे सांगता येत नाही."

'माणसांत मत्सर, हेवेदावे असतात तसे हत्तींतही असतात' ह्याचा शोध मला त्या दिवशी लागला. अखेर आपणही प्राणीजगतातल्या प्राण्यांपैकी एक प्राणी आहोत. म्हणून आपल्याला मनुष्यप्राणी म्हणतात.

हत्तींची पॅलेटस् एका छोट्या पोत्यातून आली. 'हत्तींनी तोंड उघडलं की ती त्यात कशी घालायची ह्याचं प्रात्यक्षिक झालं.' गाइडने त्याचा हात हत्तीच्या तोंडात घातला होता. तशी हिंमत फार थोड्या प्रवाशांना झाली. ते तोंडाबाहेरून पॅलेटस् फेकत होते. परिणामी काही जमिनीवर पडलेच.

हत्तींना बक्षीस देण्याचा कार्यक्रम संपल्यावर माहूत हत्तींना घेऊन गेले. प्रवाशांना गाइडने चटकन लॉजमधे जाण्याची सूचना दिली. एव्हाना हाइनांच्या गर्जना फक्त ऐकू येऊ लागल्या होत्या.

आम्ही लॉजमधे जाताच हाइना आले. हत्तींनी जमिनीवर पाडलेल्या पॅलेटस्ची मेजवानी त्यांना हवी होती. आम्ही त्यांना बघत लॉजच्या कठड्याजवळ उभे होते. पॅलेटस् संपताच ते पळून गेले.

गाइडने प्रवाशांना परत बंद खोलीत बोलावलं.

आम्ही स्थानापन्न झाल्यावर प्रत्येक प्रवासी हत्तीवर चढताना व आम्ही सर्व जंगलातून सफारी करत असताना काढलेली डी.व्ही.डी. समोरच्या पडद्यावर दाखवली. सर्वांनी एकाग्रतेने ती पाहिली. ती बघून झाल्यावर टाळ्यांचा गजर झाला.

नंतर गाइडने "तो लॉज चालवायला खूप खर्च येतो. ती सी. डी. विकत घ्या. जमलं तर देणगी द्या. गिफ्ट शॉपमधल्या वस्तू विकत घ्या" अशी विनंती केली.

लोकांनी ते मनावर घेतलेलं दिसलं.

'मी हत्तीवरून जंगलात हिंडले' अशी बढाई मला मारायची होती म्हणून मी सी.डी. विकत घेतली. गिफ्टस् घेतल्या.

व्हॅनस् परत आल्या. दुसरे प्रवासी आले होते. आम्ही व्हॅनमधे परत चढलो. सफारी संपली होती.

हिंस्र पशूंच्या पिल्लांना मांणसाने वाढवलं व ती मोठी झाल्यावर जंगलात सोडली तर ते पशू आपल्या पालकाला विसरत नाहीत. "जंगलात असे पालक सिंहाच्या त्यांनी वाढवलेल्या छाव्याला सोडतात व नंतर त्याला भेटायला जातात. तेव्हा सिंह त्यांच्याकडे धावत येतो. त्यांना चाटतो.' अशा फिल्मस् मी पाहिल्या आहेत.

हत्तीची पिल्लं माणसाळतात ह्याचं मला आश्चर्य वाटलं नाही. पण जंगली मोठे हत्तीसुद्धा आपणावर उपचार केलेल्या उपकारकर्त्याला विसरत नाहीत, येव्हढंच नव्हे तर तो असताना इतर अपरिचित माणसांना आपल्या पाठीवर बसून हिंडायला देतात ह्याचं मला आश्चर्य वाटलं.

हत्तीतलं हे मनुष्यत्व माझ्या हृदयाला स्पर्श करून गेलं.

शेवटी हत्तीही आपल्यासारखा प्राणीच आहे!